Minutes of meeting held on 26, 27, 28 Dec 1985 in Goregaon. dated; 11/1/1986 - by Ajit Sardar

युवक क्रांती दल [ महाराष्ट्र ]
१२४३/२, आपटे रोड,
पुणे - ४११ ००४.

दि. ११.१.१९८६

सप्रेम नमस्ते.

युवक क्रांती दलच्या प्रमुख कार्यकर्त्यांची एक बैठक दि. २६, २७, २८ डिसेंबर ८५ या काळात गोरेगाव [ मुंबई ] येथे झाली. त्यामध्ये मुंबई, पुणे, औरंगाबाद , वैजापूर, खुलताबाद, नागपूर येथील केंद्रातून सुमारे ३५ कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत तीन टिपणांवर तसेच काही संघटनात्मक बाबींवर चर्चा झाली.

१. टिपणांवरील चर्चा

अ. समविचारी संघटनांशी राजकीय संवाद :- या टिपणावरील चर्चेत समविचारी संघटनांशी भूमिकाविषयक व कार्यक्रमांच्या पातळीवर संवाद वाढवण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

ब. राशिन ते वैजापूर - सुधागड : एक आढावा :- १९७४ पासून युक्रांदने राशिनमध्ये ग्रामीण भागातील कार्याला सुरवात केली. तेव्हापासून सध्या वैजापूर परिसर व सुधागड तालुक्यात चालू असलेल्या ग्रामीण कार्याचा आढावा, त्यातून उत्क्रांत झालेली कार्यपध्दती, यांचे विश्लेषण व मूल्यमापन या टिपणात करण्यात आले आहे.

क. सद्य राजकीय स्थितिविषयक निवेदन :- भारतातील व विशेषत: महाराष्ट्रातील सध्याची राजकीय व सामाजिक, आर्थिक परीस्थिती, तिला कारणीभूत असणारी तत्कालीन कारणे व दीर्घकालीन धोरणे, भारतीय समाजातील वेगवेगळ्या आर्थिक शक्तींचे स्वरूप, राजकीय पक्षांची ध्येय धोरणे व त्यांचे स्वरूप आणि सद्यस्थितीत युक्रांद समोरील आव्हान यांचा परामर्श या टिपणात घेण्यात आला आहे

या तिन्ही टिपणांवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. राजकीय परीस्थितीविषयक टिपणाबाबत आलेल्या सूचनांचा विचार करून कार्यकारणीने अधिक चर्चा करावी, तसेच सर्व केंद्रात याविषयी चर्चा घडवून आणावी असे ठरले.

२. <u>संघटनाविषयक :-</u>

संघटनेच्या सर्व केंद्राचे दैनंदिन कामकाज व आर्थिक स्थिती या या विषयी अहवाल सादर करण्यातआले. संघटना अधिक क्रियाशील व परिणामकारक होण्याच्या दृष्टीने पुढील निर्णय घेण्यात आले.

अ. प्रत्येक स्थानिक केंद्राच्या कार्यकर्त्यांनी पंधरा दिवसांनी नियमितपणे बैठका घ्याव्या.

ब. आपल्या केंद्रातील कामकाजाचा अहवाल देणारे पत्र महिन्यातून एकदा नियमितपणे मध्यवर्ती कचेरीकडे प्रत्येक केंद्राने पाठवावे असे ठरले.

क. आर्थिक निधी उभारणीच्या दृष्टीने आपल्याला उपलब्ध असलेल्या दोन फिल्मसचा उपयोग जास्तीत केंद्रानी करून घ्यावा, तसेच इतर मार्गांनीही निधी उभारण्याचा प्रयत्न करावा असे ठरले.

ड. हितचिंतकांसाठी तयार केलेले पत्रक लवकरात लवकर सर्व हितचिंतकांकडे हाती वा पोस्टाने त्या त्या केंद्रातील कार्यकर्त्यांनी पोचवावे असे ठरले.

वरील सर्व निर्णयांच्या अंमलबजावणीची जबाबदारी स्थानिक केंद्राच्या पदाधिकाऱ्यांची आहे. दर पंधरा दिवसांनी घ्यावयाच्या बैठका प्रत्येक ताबडतोब सुरू कराव्यात.

३. <u>घोषणाविषयक :-</u> "घोषणा" चे वर्गणीदार, आर्थिक स्थिती इ. विषयी माहिती संपादक अजित सरदार यांनी दिली. सर्व कार्यकर्त्यांकडून "घोषणा"च्या बाबतीत पुढील अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या.

अ. कामाचे वृत्त, लेख, टिपणे, महत्वाच्या लेखांचे इतर भाषांतून अनुवाद, कथा कविता इ. विषयातील साहित्य स्वत: किंवा इतरांकडून लिहून घेऊन पाठवले.

ब. वर्गणीदार वाढवणे व जुन्या वर्गणीदाराचे नूतनीकरण .

क. जाहिरात मिळवून देऊन आर्थिक हातभार.

कळावे,

आपला,

[ अजित सरदार ]
कार्यवाह, युवक क्रांती दल
[ म हा रा ष्ट्र ]